# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ / पौष ८, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **कामगार मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता,महिला व बालविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---

**मौजे गढी (ता.गेवराई, जि.बीड) येथे कार्यान्वित असलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१) * ५०९९९ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गढी (ता.गेवराई, जि.बीड) येथे पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर करुन तो खर्च देखील करण्यात आला असतानाही याच कामासाठी पुन्हा जल जिवन मिशन अंतर्गत सन २०२२-२०२३ या कालावधीसाठी नव्याने १ कोटी ९८ लाख ४० हजार ९०० रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालिंदर डावकर एजन्सीने नव्याने मंजूर झालेल्या गढी पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक तयार करून सदर कामाचे कंत्राटही सदर एजन्सीला मिळाले असून कामाचा कार्यारंभ आदेश देखील दिला गेला असून जुन्याच कामांवर नवीन मंजूर कामांची देयके अधिकाऱ्यांच्या संगनमताने अदा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण योजनेचा तपशिल मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जून,२०२२ रोजी वा त्यासुमारास स्मरणपत्र देऊनही अद्याप माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेंतर्गत झालेल्या तसेच नव्याने होणाऱ्या कामांचा गुणनियंत्रक विभागाचा अहवाल मागविण्यात आला आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पूर्वीची योजना वापरुन वाढीव पाण्यासाठी शासनाच्या निकषानुसार रेट्रोफिटींग अंतर्गत नवीन योजना आहे.

ई-निविदेद्वारे पात्र ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) सदर योजनेच्या कामाचे गुणनियंत्रनाबाबत टाटा कन्सल्टंसी मार्फत पाहणी करण्यात आली असून गुणनियंत्रण अहवाल मागविण्यात आलेला आहे. तसेच सदर कामास उप आयुक्त (विकास), औरंगाबाद यांनी भेट देऊन पहाणी केलेली आहे.

(६) उप आयुक्त (विकास), औरंगाबाद यांनी भेट देऊन पहाणी केलेली आहे. पुर्वीची योजना वापरुन वाढीव पाण्यासाठी शासनाच्या निकषानुसार नवीन योजना असल्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उदगिर (जि. लातूर) तालुक्यातील बोगस डॉक्टरांविरुध्द कारवाई करण्याबाबत**

**(२) * ५०३५० श्री.संजय बनसोडे (उदगीर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि. लातूर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये बोगस डॉक्टर्स आढळून आले असून त्यांनी रुग्णांवर केलेल्या उपचारामुळे रुग्णांची प्रकृती बिघडल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "आजादी का अमृत महोत्सवानिमित्त" या कार्यक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी, लातूर यांच्या आदेशानुसार बोगस डॉक्टर्स शोध मोहिम राबविण्यासाठी तहसिलदार, उदगीर यांचे अध्यक्षतेखालील कृती समितीची तहसिल कार्यालयात दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास बैठक घेण्यात येऊन बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची आरोग्य पथके नियुक्त करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोग्य पथकाने तेथील हंडरगुळी, गुडसर, शिरोळ व दावणगांव (ता. उदगिर) येथील बोगस डॉक्टरांच्या दवाखान्यांवर धाडी टाकून त्यांचेविरुध्द उदगिर ग्रामीण व वाढवणा पोलिस ठाण्यात दिनांक ७ व ८ ऑगस्ट, २०२२ रोजी गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बोगस डॉक्टरांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीश महाजन :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) उदगीर तालुक्यातील चार बोगस वैद्यकीय व्यवसायिकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३ व ३६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून, याबाबत पोलीसांमार्फत तपास सुरु आहे.

राज्यातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी व त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या दि.०७.०२.२००२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५.१२.२००१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच दि.०५.०९.१९९१ च्या शासन निर्णयान्वये तालुका स्तरीय, महानगरपालिका स्तरीय व नगरपरिषद

स्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांना व पोलीसांना बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत दि. ०७.०२.२००० व दि. १९.०८.२००० च्या परिपत्रकान्वये तसेच दि.१५.१२.२०२१ च्या शासनपत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. या समित्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन त्यांच्याविरुद्ध संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची रितसर कारवाई पोलिसांमार्फत करतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये वीज जोडणी करण्याबाबत**

**(३) * ५१५४६ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेने वीज जोडणीकरीता ११८१ अंगणवाडयांना निधी दिला असतानाही ९१३ अंगणवाडयात अद्यापही वीज जोडणी होवू शकली नसल्याचे दिनांक ४ नोव्हेबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाड्यांना वीजेअभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर अंगणवाडी केंद्रांना तातडीने वीज जोडणी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे,

पुणे जिल्हा परिषदमार्फत सर्व अंगणवाडी केंद्राना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अंगणवाडी सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यात येत असून सदर कार्यक्रमातंर्गत सर्व अंगणवाडी केंद्राचे सर्वेक्षण केले असता ११८१ अंगणवाडी केंद्रांना वीज उपलब्ध नसल्याचे माहे जून, २०२२ अखेर निर्दशनास आले. यासाठी जिल्हा परिषद मार्फत तात्काळ माहे जुलै २०२२ मध्ये प्रति अंगणवाडी रुपये ३०००/- प्रमाणे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. दिनांक ४ नोंव्हेंबर, २०२२ पर्यत २६८ अंगणवाडी केंद्राची वीज जोडणी प्रक्रिया पुर्ण झालेली असून उर्वरीत ठिकाणी वीज जोडणी प्रक्रिया सुरु आहे. सदर वीजजोडणी प्रक्रिया माहे जानेवारी २०२३ अखेर MSEB च्या सहकार्याने पुर्ण होणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) अंगणवाडी केंद्राना नवीन वीज जोडणी करण्यासाठी विहीत नमुन्यात ग्रामपंचायत मार्फत MSEB कडे अर्ज सादर करावा लागतो व ठेव रक्कम जमा केल्यानंतर MSEB मार्फत मीटर बसविण्याचे कामकाज करण्यात येते.

यापैकी काही अंगणवाडी केंद्राचे पुर्वीचे वीज देयक थकीत असल्याने त्यांना नवीन वीज जोडणी न देता थकीत विद्युत देयके ग्रामपंचायत मार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. देयक भरल्यानंतर जुने मीटर पुन्हा कार्यान्वित करण्यात येत आहेत.

तसेच, वीज कनेक्शन साठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामपंचायतपैकी ११७ ग्रामपंचायतीच्या खातेवर PFMS मार्फत निधी हस्तातंरीत होऊ शकला नसल्याने त्यांचेकडून अद्ययावत बॅक खातेसंदर्भातील माहिती घेऊन पुन:श्च निधी पाठविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

**जळगाव जिल्ह्यात प्रधानमंत्री मातृवंदना योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान देण्याबाबत**

**(४) * ५१५०१ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात प्रधानमंत्री मातृवंदना योजनेअंतर्गत सुमारे ५ हजार ५५० महिला लाभार्थ्यांचे सुमारे २ कोटी ७५ लाख रुपये इतके अनुदान प्राप्त झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरोदर माता व बालकांना सकस आहार मिळावे व त्यांचे आरोग्य सुधारावे आणि माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने सुरू केलेल्या या योजनेचे अनुदान मागील सहा महिन्यापासून मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त योजनेचे अनुदान त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या पोर्टल अनुषंगिक डुप्लिकेट नोंदी काढण्याबाबत तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या असून लाभार्थींना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मानसिक आरोग्य कार्यक्रमासाठी वितरीत केलेल्या निधीचा पूर्णपणे विनियोग करण्याबाबत**

**(५) * ४९६९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून मानसिक आरोग्याच्या कार्यक्रमासाठी राज्याला सन २०१९ ते २०२२ या तीन वर्षासाठी १०६.३१ कोटी रुपयांचा निधी मिळाला असून त्यातील केवळ ५.४ टक्के निधीचा विनियोग करण्यात आला असून उर्वरित निधी अखर्चित राहिला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालावधीत राज्य शासनानेही या कार्यक्रमासाठी ५१.५१ कोटीचा निधी दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, मानसिक आजारांसह ताण-तणावांसाठी वैद्यकीय उपचार घेणा-यांसाठीची संख्या सातत्याने वाढती असली तरीही त्यांच्यावर उपचार करणा-या डॉक्टरांची संख्या कमी असून अशा रुग्णालयातील अ, ब व क गटातील ३५ टक्यांहून अधिक जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात मनोरुग्णालयांची संख्या कमी असल्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार करता येत नसल्यामुळे राज्यातील मनोरुग्णालयांची संख्या वाढविण्याची मागणी सर्वच स्तरातून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील मानसिक आरोग्यासाठी प्राप्त होण्या-या निधीचा पुरेपुर विनियोग करुन मनोरुग्णालयांची संख्या वाढविणे त्याचप्रमाणे अशा रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

मानसिक आरोग्यासाठी केंद्र शासनाकडून सन २०१९ ते सन २०२२ या तीन वर्षाच्या कालावधीत एकूण २३.५५ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्यापैकी ११.३७ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. यास्तव केंद्र शासनाकडून प्राप्त निधीच्या एकूण ४८.३० टक्के निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाकडून सन २०१९ ते सन २०२२ या तीन वर्षात प्राप्त झालेल्या एकूण ४३६.५७ कोटी निधीपैकी ३८२.५८ कोटी निधी खर्च झालेला आहे. यास्तव राज्य शासनाकडून प्राप्त निधीच्या एकूण ८७.६३ टक्के निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय अधिकारी सेवा, गट-अ वर्ग-१ ची मनोविकृती विशेष तज्ञांची रिक्त असलेल्या पदांची दिनांक ३१.१२.२०२१ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात देण्यात आलेली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने माहे, नोव्हेंबर २०२२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. तसेच गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

(४) हे खरे नाही.

राज्यात पुणे (२५४० खाटा), ठाणे (१८५० खाटा), नागपूर (९४० खाटा), रत्नागिरी (३६५ खाटा) या मनोरुग्णालय कार्यरत आहेत. त्यांची एकुण ५६९५ मनोरुग्णांची भरती करण्याची क्षमताआहे.राज्यातील ३४ जिल्हा रुग्णालयात मानसिक आजारावर उपचार करण्याची सोय उपलब्ध आहे. तसेच राज्यातील १४७१ प्राथमिक आरोग्य केंद्रात मनशक्ती क्लिनिक सुरु करण्यात आले आहे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये येथे ही मानसिक आजारावर उपचाराची सोय आहे.

(५) राज्यात पुणे, ठाणे, नागपूर व रत्नागिरी या ०४ ठिकाणी मनोरुग्णालये कार्यरत आहेत. तसेच जालना येथे नव्याने ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय मंजूर केलेले आहे. त्याचप्रमाणे रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यलायाच्या रुग्णालयातील समस्याचे निराकरण करणेबाबत**

**(६) * ५१९५५ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यलायाच्या रुग्णालयास शासनाने गत अनेक वर्षापासून औषध व सर्जिकल साहित्य खरेदीसाठी निधी कमी दिल्यामुळे पुरवठादारांची थकबाकी वाढल्याने रुग्णालयावर सुमारे साडे आठ कोटींचे कर्ज झाले असल्याने रुग्णांना मोफत औषध व सर्जिकल साहित्य मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच ,गत दहा वर्षापासून सुरु असलेली हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम (एचएमआयएस) ही ऑनलाईन सेवा कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता अचानक बंद करण्यात आल्यामुळे कार्डची नोंदणी हाताने करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्डची नोंदणी करण्यास कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असल्यामुळे रुग्णांना उपचाराविना परत जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, किडनी विकार ग्रस्तांसाठी असलेले डायलिसिसची यंत्रे बंद असून सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल मधील किडनी प्रत्यारोपण युनिट देखील बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यलायाच्या रुग्णालयास उपरोक्त सर्व सुविधा मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) संस्थेमधील किडनी विकार विभागात एकूण सहा डायलेसिस यंत्रे असून सर्व कार्यान्वित आहेत. तथापि, सदर विभागात असलेल्या रिक्त पदांमुळे सध्य:स्थितीत किडनी प्रत्यारोपन युनीट बंद आहे. संस्थेमधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आयुर्वेदिक महाविद्यालयात प्रवेशबंदीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(७) * ५३०६२ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई, जळगाव, नांदेड, नागपूर व उस्मानाबाद येथील अपुरा शिक्षक वर्ग, महाविद्यालयातील पायाभूत सुविधांची कमतरता व विविध कारणांमुळे राष्ट्रीय भारतीय चिकित्सा पध्दती परिषदेने आयुर्वेदिक महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश बंदी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवेश बंदीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याने उक्त महाविद्यालयात सर्व बाबींची तात्काळ पूर्तता करुन प्रवेशबंदी उठवावी अशी मागणी नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) या डॉक्टरांच्या संघटनेने मा. मुख्यमंत्री यांना पत्राव्दारे केली असल्याचे दिनांक ५ नोव्हेबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोगाने शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात काही त्रुटी असल्याने प्रथमत: परवानगी नाकारली होती तथापि त्या त्रुटींपैकी बहुतांश त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे. शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील अध्यापकीय पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आल्यानंतर, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे दिनांक २१.११.२०२२ चे पत्रान्वये राज्यातील मुंबई, नागपूर, नांदेड, उस्मानाबाद व जळगाव येथील एकूण पाच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांनी विद्यार्थी प्रवेशास मान्यता प्रदान केली आहे .
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मुंबईतील सर ज.जी. रूग्णालयात आवश्यक औषधांचा पुरेसा साठा नियमीत करण्याबाबत**

**(८) * ४९५८२ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सर ज.जी. रूग्णालयात आवश्यक औषधांचा पुरवठा होत नसून दैनंदिन वापराची औषधेही उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अत्यावश्यक औषधांच्या साठ्यावर लक्ष ठेवण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करुनही या रुग्णालयात मोठया प्रमाणात औषध टंचाई होत असून रुग्णांना स्वखर्चाने बाहेरून औषधे विकत घ्यावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने आवश्यक औषधांचा पुरवठा नियमित होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१), (२) व (३) नाही, तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. २६.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार आवश्यक औषधे व सर्जिकल्स साहित्याची खरेदी हाफकिन महामंडळामार्फत करुन संस्थांना पुरवठा करण्यात येतो. अत्यावश्यक साठ्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याकरिता रुग्णालयात तीन सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीच्या शिफारशीनुसार रुग्णालयात लागणा-या अत्यावश्यक व प्राथमिक औषधे रुग्णांकरिता उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नोंदणी करुन रुग्णांना उपचाराकरिता लागणारे सर्व औषधी बाबी पुरविण्यात येतात. सर ज. जी. समूह रुग्णालयास सन २०२२ - २०२३ या वित्तीय वर्षात औषधे व सर्जिकल्स साहित्यांची खरेदी करण्यासाठी रु. २४.३१ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. याव्यतिरिक्त स्थानिक स्तरावर महात्मा फुले जन आरोग्य योजना, सीएसआर फंड, पीएलए खात्यातून तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध निधीमधून तातडीची व आवश्यक खरेदी करुन रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील किमोथेरपी यूनिट मध्ये औषधाचा तुटवडा असल्याबाबत

**(९) * ५३६६३ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे कॅन्सरग्रस्त रुग्णांवर किमोथेरपीच्या माध्यमातून उपचार केले जात असून त्यासाठी लागणाऱ्या औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयात उपचाराअभावी कॅन्सरग्रस्त रुग्णांना खाजगी रुग्णालयातील उपचारासाठी स्वखर्चाने जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२-२३ मध्ये किमोथेरपी औषधी खरेदी करण्यासाठी निधी प्राप्त झाला असून सदर निधी औषध खरेदीसाठी वितरीत करण्यात आलेला आहे. जिल्हा रुग्णालय अमरावती येथे १० खाटांचे किमोथेरपी डे-केअर सेंटर कार्यान्वीत असून, संदर्भसेवा रुग्णालय अमरावती येथे ५० खाटांचे टर्शरी कॅन्सर केअर सेंटर सुरु करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच, संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे कर्करोग निदान व शस्त्रक्रिया (ऑंको सर्जरी, रेडीओ थेरपी) ईत्यादी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१०) * ५२५३७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, लघुसिंचन विभागातील मुदत ठेवमधील गैरव्यवहारातील मुख्य सुत्रधार असलेले नानक कंत्राटदार यांचेविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असतांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांची पूर्व परवानगी न घेता ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सदरहू कंत्राटदाराला कोट्यावधी रुपयांची देयके मंजूर करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कामांची पाहणी व कोणतीही चौकशी न करता नानक या कंत्राटदाराला ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची सर्वाधिक कामे व देयकांचे प्रदान करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे नाही,

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशषत: मुंबई व पुणे शहरामध्ये गोवर/ रुबेला साथ आटोक्यात आणण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(११) * ५३५८४ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई व पुणे शहरामध्ये बालकांमध्ये गोवर/ रुबेला या आजाराची साथ मोठया प्रमाणात पसरली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या आजाराने अनेक बालके बाधित असून कित्येक बालकांचा मृत्यू देखील झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा आजार आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

राज्यात दिनांक ९ डिसेंबर २०२२ अखेर गोवर आजाराचे एकूण १२१ उद्रेक झाले असून त्यापैकी मुंबई शहरात ५६ उद्रेक झाले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे .

राज्यात दिनांक ९ डिसेंबर २०२२ अखेर ९५१ बालके गोवर आजाराने बाधित झाले असून १७ बालकांचा मृत्यू झाला आहे. तथापि रुबेला आजाराने बालकांचा मृत्यू झालेला नाही.

(३) राज्यात तसेच मुंबई शहरामध्ये गोवर आजाराचा उद्रेक रोखण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना केल्या जात आहेत-

• राज्य टास्क फोर्सची स्थापना व त्यांच्या बैठका आणि आंतरविभागीय समन्वय

• कुपोषित बालकांची माहिती घेऊन त्यांच्यावर विशेष लक्ष- उपचारात्मक पोषण, जीवनसत्व अ आणि गोवर लसीकरण त्याचप्रमाणे गोवर आजाराचा उद्रेक रोखण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना केल्या जात आहेत.

१) घरोघरी आरोग्य कर्मचा-यांच्या पथकाद्वारे गोवर रुग्ण सर्वेक्षण - आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्ती यांच्या पथकाद्वारे घरोघरी जाऊन ताप, पुरळ, सर्दी किंवा खोकला, डोळे लाल होणे इ. लक्षणे असलेल्या रुग्णाचे सर्व्हेक्षण

२) जीवनसत्व अ ची पुरक मात्रा - संशयित रुग्णांना जीवनसत्व अ च्या दोन मात्रा २४ तासाच्या अंतराने देण्यात येतात.

३) गोवर रुबेला लसीचा डोस - ५ वर्षाखालील ज्या बालकांचा पहिला किंवा दुसरा गोवर रुबेला लसीचा डोस राहिला असेल अशा बालकांना गोवर रुबेला लसीचे डोस.
४) उद्रेक झालेल्या भागांमध्ये अतिरिक्त गोवर रुबेला लसीचा डोस - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार ६ महिने ते ९ महिने वयाच्या बालकांना झिरो डोस व ९ महिने ते ५ वर्षापर्यतच्या बालकांना गोवर रुबेला लसीचा एक अतिरीक्त डोस.
५ गोवर गुंतागुंतीचे रुग्णांवर उपचार - गंभीर अथवा गुंतागुंतीच्या रुग्णांना अंतररुग्ण सेवेसाठी नजीकच्या रुग्णालयात संदर्भ सेवा उपलब्धता.
६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण - गोवर आजारासंदर्भात सर्व्हेक्षण, लक्षणे व उपचार, लसीकरण याबाबत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण.
७ खाजगी वैद्यकीय व्यावसायिक तसेच युनानी डॉक्टर्स यांच्या कार्यशाळेचे आयोजन करुन गोवर आजार रुग्ण शोध व गोवर रुबेला लसीकरणामध्ये सहकार्य करण्याबाबतचे आवाहन.
८ स्थानिक मौलाना तसेच धर्मगुरु आणि स्थानिक प्रभावी व्यक्तींच्या बैठकांचे आयोजन.
९ आरोग्य शिक्षण व प्रसिध्दी-
• जनतेत गोवर आजाराबाबत माहिती होण्यासाठी तसेच जनतेत लसीकरणाबाबत जागृकता निर्माण करण्यासाठी विविध माध्यमाद्वारे प्रसिध्दी देऊन आरोग्य शिक्षण
• घरभेटीद्वारे वैयक्तिक संपर्क साधून बालकांच्या पालकांना आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे.
• रिक्षाद्वारे मायकिंग तसेच पोस्टर्स व बॅनर्सचा वापर.
१० राज्यस्तरीय तसेच केंद्र शासन स्तरीय पथकाद्वारे उद्रेकग्रस्त भागात भेटी व आढावा- केंद्र शासन स्तरावरुन तसेच राज्यस्तरावरुन पथकाद्वारे उद्रेकग्रस्त भागात भेट देऊन गोवर साथी संदर्भात आढावा व मार्गदर्शन.
११) शासन स्तरावरुन नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागातील गैरव्यवहाराबाबत

**(१२) * ५०११७ श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्याचा पासवर्ड वापरुन देयके मंजूर केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कागल पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांची बनावट सही करुन देयके काढली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करून संबधीत अधिकाऱ्याचा खुलासा घेण्यात आला आहे. या प्रकरणी संबधीत मक्तेदारांनी देयके परस्पर फॉरवर्ड केल्याचे दिसून येते. त्यामुळे मक्तेदारांचे पुढील सहा महिन्यांसाठी नोंदणी प्रमाणपत्र संस्थगीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषत: नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्याबाबत**

**(१३) * ४९९१२ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असतानाही मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी शासनाने दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करूनही या योजनेसाठी नाशिक जिल्ह्यातील रस्त्यांची निवड करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेसाठी शासनाने जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची तरतूद दिनांक १८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत रस्त्यांची तातडीने निवड करून कामे सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षाकरिता नाशिक जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या ३७४.०० कि.मी. लांबीच्या उद्दिष्टानुसार, मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीने रस्त्यांची दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी निवड केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदरहू निवड यादीतील रस्त्यांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यास अनुसरून सदर रस्त्यांचा कामास प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरीवली (मुंबई) येथील मोदी स्पेसेस ॲण्ड रिॲल्टी कंपनीच्या बांधकाम साईटवर मशीन कोसळून कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१४) * ५०६४५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथे मोदी स्पेसेस ॲण्ड रिॲल्टी कंपनीच्या स्वोल्गा बिल्डींग, हरीदास नगर, शिंपोली रोड येथील बांधकाम साईटवर १४ व्या मजल्यावरुन मशिन कोसळून एका कामगाराचा मृत्यू झाल्याचे दिनांक २३ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्याअनुषंगाने दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर तसेच, कामगार कायद्याप्रमाणे मृत झालेल्या कामगारांच्या परिवारास अर्थसाहय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे. मोदी स्पेसेस ॲण्ड रिअल्टी कंपनीच्या बोल्गा बिल्डींग, हरीदास नगर, शिंपोली रोड, बोरीवली (प.), मुंबई येथील बांधकाम साईटवर दिनांक २१ सप्टेंबर,२०२२ रोजी मटेरियल लिफ्टींग मशीन अंगावर कोसळून अभिमन्यू साईबा सेठी या बांधकाम कामगाराचा मृत्यू झाला.

(२) कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर यांचे कार्यालयातील क्षेत्रिय अधिकारी यांनी, बांधकाम साईटवर प्रत्यक्ष भेट देवून आस्थापनेस इमारत व इतर बांधकाम कामगार (कामगारांचे नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६, किमान वेतन अधिनियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० या विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारीत केले आहेत.

तसेच मे.मोदी स्पेसेस ॲण्ड रिॲल्टी कंपनीच्या बांधकाम साईट बांधकामाच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतुदींनुसार इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक ५ डिसेंबर,२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

व्यवस्थापनाकडून मयत कामगार अभिमन्यू साईबा सेठी यांचे वारसदार आई श्रीमती निराबाई सेठी यांना रु.७,००,०००/- (अक्षरी रूपये सात लाख) आर्थिक नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच मृत कामगाराचे बंधु श्री. रविंद्र सेठी यांना अत्यंविधी संस्कार व इतर आर्थिक गोष्टींसाठी तात्काळ मदत रक्कम रुपये १,२९,५००/- अदा केली आहे.

सदर अपघाताशी संबंधित बांधकाम कंत्राटदार आणि इतर ४ साईट सुपरवायझर अशा एकुण ५ व्यक्तींवर भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ए अन्वये गुन्हा (FIR) क्र. १३८२, दि. २२.०९.२०२२ रोजी बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजने अंतर्गत कॉकलीअर इम्प्लांट (Cochlear Implant Surgery) शस्त्रक्रिया करीताच्या वयोमर्यादेत वाढ करणेबाबत

**(१५) * ५२५७२ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन व केंद्र शासनाकडून जन्मत:च कानाने ऐकू न येणाऱ्या लहान बालकांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व ADIP या योजनेअंतर्गत कॉकलीअर इम्प्लांट (Cochlear Implant Surgery) शस्त्रक्रिया केली जात असून राज्यातील सर्व जिल्हयांत या कार्यक्रमाअंतर्गत दोन वर्षापर्यंतच्या बालकांवर दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून सदर सर्जरी (Cochlear Implant Surgery) केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी शासनाने नेमून दिलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांकडून सर्जरी करीता पैशाची मागणी करण्यात येत असून पैशाअभावी उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे बालकांना वेळेत उपचार होत नसल्याने त्यांचे वय वाढल्यामुळे शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेच्या निकषात सदर बालके बसत नसल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया (Cochlear Implant Surgery) केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेअंतर्गत उपचाराकरीता बालकांचे वय हे पाच वर्षापर्यंत करण्याबाबत लोकप्रतिनीधींनी यांनी मा.आरोग्य मंत्री यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राष्ट्रीय बाल स्वास्थ योजने अंतर्गत उपचारासाठी वयोमर्यादेत वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३० ऑगस्ट,२०२२ च्या पत्रान्वये Cochlear Implant Surgery करीता वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वाढ करण्यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे मागणी केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील मेयो रूग्णालयात स्वतंत्र त्वचा रोग विभाग कार्यान्वित करण्याबाबत**

**(१६) * ५४२२५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेयो रूग्णालयात त्वचा रोगासाठी स्वतंत्र विभाग नसल्याचे दिनांक १० ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्वचा रोगांचे वाढते प्रमाण व त्यावर करावयाचे खाजगी उपचार अत्यंत महागडे व सर्वसामान्यांच्या आटोक्यातील नसल्यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेयो रुग्णालयात स्वतंत्र त्वचा रोग विभाग कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही.

(२) नाही

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कुष्ठ व क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये होणारी वाढ आणि परिणामी संभाव्य मृत्यूंची वाढणारी संख्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(१७) * ५००५५ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी क्षय व कुष्ठरोगाची लागण झालेल्या रूग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने नागरीकांची तपासणी करुन कुष्ठ, मानसिक रुग्ण आणि क्षयरुग्ण शोधमोहिम अभियान दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ ते ३० सप्टेंबर,२०२२ या दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाने राबविलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक आरोग्य संघटनेच्या क्षयरोग विषयक वार्षिक अहवालानुसार भारतात सन २०२० च्या तुलनेत सन २०२१ मध्ये १८ टक्के रुग्णवाढ तसेच मृत्यूसंख्येत देखिल वाढ झाली असून देशात आढळत असलेल्या एकूण क्षयरोग रुग्णांपैकी राज्यात जवळपास ९ % रुग्ण आढळतात तसेच यामुळे मृत्यूचे प्रमाण देखील राज्यात सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागामार्फत योग्य ते नियोजन व खबरदारी न घेतल्यामुळे कुष्ठ व क्षयरोगाची लागण झालेल्या रूग्णांची संख्या नियंत्रणात येत नसून वाढतच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात कुष्ठ व क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये होणारी वाढ आणि परिणामी संभाव्य मृत्यूंची वाढणारी संख्या रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ दरम्यान कुष्ठरोग शोध मोहिम आणि सक्रिय क्षयरुग्ण शोध अभियान एकत्रितरित्या राबविण्यात आले होते.

तसेच उपरोक्त नमूद कालावधीत मानसिक रुग्ण शोध मोहिम अभियान राबविण्यात आले नव्हते. तथापि माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानामध्ये ताण तणाव प्रतिबंधात्मक समुपदेशनातंर्गत महिलांच्या मानसिक आरोग्याकरिता समुपदेशन करण्यात आले होते.

(२) हे अंशत: खरे आहे .

• राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत सन २०२० मध्ये १,६०,०७२ क्षयरुग्ण शोधण्यात आले व सन २०२१ मध्ये २,००,२४० क्षयरुग्ण शोधण्यात आले. त्या अनुषंगाने असे निदर्शनास येते की, सन २०२१ मध्ये १५% नी रुग्णवाढ झाली आहे.
• देशातील एकूण क्षयरुग्णांच्या ९.३ टक्के इतके क्षयरुग्ण सन २०२१ साली राज्यात आढळले आहेत.
• राज्यात क्षयरोगामुळे मृत्यूचे प्रमाण सन २०२० व सन २०२१ मध्ये अनुक्रमे ४.७ व ४.२ टक्के आहे.

(३) हे खरे नाही.

विभागाने योग्य नियोजन व नियमित पाठपुरावा करुन समाजातील कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोधण्यासाठी सक्रिय रुग्ण शोध व अप्रत्यक्ष (पॅसीव्ह) सर्वेक्षणाद्वारे रुग्ण शोध राबविण्यात आल्यामुळे जास्तीत जास्त रुग्ण शोधण्यात यश मिळाले आहे. तसेच रुग्ण शोधून लवकर औषधोपचाराखाली आल्याने रोगाच्या ससंर्गाची साखळी खंडीत होण्यास मदत होते.

(४) **राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत खालील उपाययोजना करण्यात येत आहे-**

• क्षयरोगाचे निदानासाठी राज्यामध्ये २०२५ सूक्ष्मदर्शी केंद्रे कार्यान्वित आहेत.
• प्रत्येक तालुका स्तरावर व सर्व महानगरपालिका कार्यक्षेत्रात CBNAAT व TRUENAT द्वारे निदान व औषधांची परिणामकारकता तपासण्यात येते.
• निक्षय पोषण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन उपचार कालावधीमध्ये रुग्णास रु. ५००/- दरमहा अर्थसहाय दिले जाते.
• कार्यक्रमांतर्गत क्षयरोग शोधण्याकरिता वर्षातून किमान एकदा सक्रिय क्षयरोग शोध मोहिम घेण्यात येते.
• राज्यात खाजगी क्षेत्रात बरेच रुग्ण उपचार घेत असल्याने कार्यक्रमांतर्गत शासकिय सुविधा खाजगी क्षेत्रातील रुग्णांना मिळवून देण्यासाठी PPSA योजना राज्यामध्ये सुरु आहे.

**कुष्ठरोगाला आळा घालण्यासाठी कार्यक्षेत्रात खालील उपाययोजना करण्यात येत आहेत**.

• विविध माध्यमांव्दारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहीती देवून कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी स्वतःहून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
• शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्या मार्फत संशयित रुग्ण शोधण्यात येतात निदाननिश्चिती झालेनंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.
• नविन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.
• शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते .

• सन २०१६-१७ पासून दरवर्षी " कुष्ठरुग्ण शोध मोहीम व स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहीम" राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार देण्यात आले आहेत.
• शुन्य कुष्ठरुग्ण आढळलेली गावात पुन्हा सर्वेक्षण करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चांडोली व चाकण (ता.खेड, जि.पुणे) तालुक्यातील बालकांमध्ये जीवनसत्वाचा अभाव असल्याबाबत**

**(१८) * ५५६३८ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांडोली व चाकण (ता.खेड,जि.पुणे) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात बालकांची आरोग्य तपासणी केली असता सुमारे २७४ बालकांपैकी जीवनसत्वाचा अभाव असणारी १९० , जन्मदोष असणारी १० , त्वचारोग ४ , डोळेदोष १० , दंतरोगाचे १ आणि इतर आजार असणारी ५७ बालके आढळून आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने बालकांना आरोग्य सोयी-सुविधा देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) चांडोली व चाकण (ता.खेड, जि.पुणे ) येथील ग्रामीण रूग्णालयात एकूण २५६ बालकांची तपासणी दिनांक ९ सप्टेंबर,२०२२ रोजी करण्यात आली. त्यामध्ये २५६ लाभार्थीपैंकी कमी वजन असणारी १४३, जन्मत: दोष असणारी ७, त्वचारोग असणारी १, नेत्रदोष असणारी १०, दंतरोग असणारी ५, सर्दी खोकला असणारी १०, ह्दयरोग असणारी 8, पक्षघात असणारी 1, आपस्मार असणारी २, अस्थिव्यंग असणारी ६, कृमीदोष असणारी ६, टाळू दुभंगलेले २, गतिमंद असणारी १ आणि इतर आजार असणारे ५४ बालके आढळून आले आहेत.
(२) कमी वजन असणा-या १४२ मुलांचे ६३ ठिकाणी ग्राम बाल विकास केंद्र(VCDC) घेऊन सदर मुलांना जिल्हा परिषद, पुणे येथून मोफत औषधेपचार व पोषण आहार देण्यात आला. तसेच ज्या मुलांना शस्त्रक्रियेची गरज होती त्यांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या, उर्वरीत मुलांना योग्य ते औषधोपचार देण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**भंडारा जिल्ह्यातील बँकांनी महिला बचत गटाकडून जादा दराने व्याज आकारले जात असल्याबाबत**

**(१९) * ५२६७९ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत महिला बचत गटांचे संचालन करताना विदर्भ, कोकण ग्रामीण बँक शाखेकडून ६३ बचत गटांपैकी ५७ महिला बचत गटांनी कर्ज घेतले असून शासनाकडून ६.५ टक्के दराने व्याज परतावा न दिल्याने बँकाकडून व्याज दर सरसकट १३.५ टक्के वसूल करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, भंडारा जिल्ह्यातील बँकांनी महिला बचत गटाकडून १३ टक्के दराने व्याज आकारले असल्याचे माहे सप्टेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील चार वर्षापासून महिला बचत गटांना शासनाकडून ६.५ टक्के व्याज दराचा परतावा न देण्याची सर्वसाधारण कारण काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

विदर्भ कोंकण ग्रामीण बँकेच्या गोदेंखातील शाखा वगळता इतर शाखांनी महिला बचत गटांना रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडीयाच्या नियमावलीनुसार १३.५% व्याज दराने कर्ज पुरवठा केला आहे. परंतु फक्त गोदेंखातील शाखेने अनावधानाने बँकेकडून महिला बचत गटांना १३.५% टक्यांऐवजी ७% व्याजदराने कर्ज पुरवठा केला आहे. ही बाब निदर्शनास आल्यानंतर बँकेने १३.५% व्याजदराच्या फरकाची रक्कम भरण्याबाबत महिला बचत गटांकडे मागणी केली आहे.

(२) होय. हे अंशत: खरे आहे

(३) व (४) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कर्जाची नियमित पूर्ण परतफेड केलेल्या पात्र महिला बचत गटांच्या समुहांना सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत व्याजाची भरपाई करण्यासंदर्भात अनुदान अदा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महिला ऊसतोड कामगारांसाठी “आयुर्मंगलम योजना” व “महाराष्ट्र स्थलांतर निरीक्षण” या प्रणालीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत**

**(२०) * ५०५९४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊस तोडणी कामगार व विटभट्टी कामगार यांचे कुपोषण रोखणे व शासकीय योजनांचा लाभ देणे यासाठी “महाराष्ट्र स्थलांतर निरीक्षण” प्रणाली राबविण्यात येत असून अहमदनगर, बीड, औरंगाबाद, जालना या जिल्हयातून स्थलांतरीत होणाऱ्या महिला, त्यांच्या समवेतची बालके यांनाही या मायग्रेशन ट्रेकींग सिस्टीम (एम.टी.एस.) मध्ये समाविष्ट केले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महिला ऊसतोड कामगारांसाठी “आयुर्मंगलम योजना” राबविण्याचा निर्णय बीड जिल्हा प्रशासनाने घेतला असून या योजनेअंतर्गत ऊसतोडणीला जाण्यापूर्वी महिलांची तपासणी व बालकांचे लसीकरण करण्यात येत असून सदर योजना परभणी, हिंगोली, उस्मानाबाद या जिल्ह्यालाही लागू करण्याची मागणी स्थानिकांमधून होत आहे, हे ही खरे हे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये चाचण्या वेळेवर न होणे, अकारण शस्त्रक्रिया अशा अनेक बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत Migration Tracking System (MTS) नंदुरबार, अमरावती, पालघर, चंद्रपूर, जालना, गडचिरोली या सहा जिल्हयामध्ये लागू करण्यात आली होती. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ पासून महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये लागू करण्यात आलेली आहे.

(२) परभणी, हिंगोली व उस्मानाबाद या जिल्हयांमध्ये आयुर्मंगलम योजना लागू करण्याची मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) अंश:त खरे आहे.

महिला उसतोड कामगारांच्या अनावश्यक गर्भपिशवी शस्त्रक्रिया होऊ नये यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) Migration Tracking System या सॉफ्टवेअरची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त ICDS यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेला मुद्रांक शुल्क अनुदानाची थकबाकी मिळण्याबाबत

**(२१) * ५१७३९ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून पुणे जिल्हा परिषदेला मुद्रांक शुल्क अनुदानाची थकबाकी वेळेत मिळत नसल्याने जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून केली जाणारी विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाकडे जिल्हा परिषदेच्या अनुदानाची तब्बल ५२० कोटी रक्कम थकीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुणे जिल्हा परिषदेच्या मुद्रांक शुल्क अनुदानाची थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी २०२१-२२ अखेर जिल्हा परिषदांकरिता १ % मुद्रांक शुल्क अनुदानापोटी रु.१०२०.३४ कोटी इतक्या थकित अनुदानाची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने डिसेंबर, २०२२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये १ % मुद्रांक शुल्क अनुदानापोटी रु.५००.०० कोटी इतके अनुदानपुरक मागणीद्वारे मंजुर करण्यात आले आहे.

-----------------

## नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे अतिविशेषोपचार विभाग सूरु करण्याबाबत

**(२२) * ५१४९० श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे उपचारासाठी येणाऱ्या इतर जिल्ह्यातील रुग्णांची संख्या लक्षणीय असल्याने येथे अतिविशेषोपचार (Super Speciality विभाग सूरु करण्याची नितांत आवश्यकता आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, स्थानिक रुग्णांची गरज लक्षात घेता रुग्णांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीकोनातून अतिविशेषोपचार (Super Speciality) विभाग तात्काळ सूरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अतिविशेषोपचार (Super Speciality) विभाग तात्काळ सूरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१), (२) व (३) अतिविशेषोपचार विभाग सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे. ही बाब खरी आहे. तथापि,यांची आवश्यकता व यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा,यंत्रसामुग्री,मनुष्यबळ इत्यादी बाबींची उपलब्धता विचारात घेऊन सदर प्रस्तावाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील (इर्विन) समस्या सोडविण्याबाबत**

**(२३) * ५१७०६ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) ७० सफाई कामगार कार्यरत असून त्यावर महिनाकाठी १४ लाख खर्च करुनही रुग्णालयात दुर्गंधी व अस्वच्छता असून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील बाहय रुग्ण विभागाच्या (ओपीडी) कक्षाचे छत गळतीमुळे शॉर्टसर्किट होऊन अपघाताची शक्यता निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, येथे नवीन जलकुंभ बांधुनही जुनी जीर्ण झालेली पाण्याची टाकी न हटविल्याने ती कोसळून कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
जिल्हा सामान्य रुग्णालयात काही वॉर्डमध्ये अस्वच्छता असल्याचे आढळून आले आहे. परंतू सदर अस्वच्छता दूर करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात आली.
(२) हे अंशत: खरे आहे.
बाहय रुग्ण विभागाच्या (ओपीडी) कक्षाच्या छत गळती होत असल्याने सदरची दुरुस्ती करुन मिळण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांना कळविण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
जुनी पाण्याची टाकी पाडण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तारकर्ली पर्यटन केंद्र आणि स्कुबा डायव्हिंग सेंटर येथे उभारण्यात आलेली लाकडी प्रसाधनगृहे, वॉच टॉवर आणि गझिबो यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ५०५५६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, तारकर्ली, मिठबाव, विजयदुर्ग आणि संगमेश्वर येथील पर्यटन केंद्रे आणि स्कुबा डायव्हिंग सेंटर येथे केंद्र शासनाच्या स्वदेशी दर्शन योजनेंतर्गत पर्यटकांच्या सोयी-सुविधांसाठी कोट्यवाधी रुपये खर्च करुन उभारण्यात आलेली लाकडी प्रसाधनगृहे, वॉच टॉवर आणि गझिबो यांची देखभालीअभावी दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथे बहुसंख्येने येणाऱ्या पर्यटकांची फार गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पर्यटकांची गैरसोय टाळण्याकरिता सदर बांधकामांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१),(२) व (३)

केंद्र शासनाच्या स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली, मिठबाव, विजयदुर्ग व सागरेश्वर येथील समुद्र किनाऱ्यांवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत पर्यटकांसाठी पायाभूत व सुरक्षा सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. मे, २०२१ मध्ये आलेल्या तौक्ते चक्रीवादळामध्ये या सुविधांचे विशेषत: तारकर्ली व स्कुबा डायव्हिंग केंद्र येथील विविध घटकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यामधील सागरेश्वर, विजयदुर्ग व मिठबाब येथील सुविधांच्या दुरुस्तींचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

स्कुबा डायव्हिंग केंद्र, तारकर्ली येथील सुविधांची श्रेणीवाढ करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे व्यवस्थापन हॉस्पिटल मॅनेजमेंट अँड इन्फो सिस्टीम, (HMIS) सेवा बंद केल्याबाबत

**(२५) * ५००९९ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे व्यवस्थापन "हॉस्पिटल मॅनेजमेंट अँड इन्फो सिस्टीम, (HMIS)" या खाजगी कंपनीकडे असताना ही सेवा वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाच्या आदेशानुसार दिनांक ६ जुलै, २०२२ रोजीपासून कोणतीही पूर्वसूचना न देता पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रुग्णसेवा विस्कळीत झाली असून नियोजित शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या रुग्णालयांतील संपूर्ण ऑनलाईन यंत्रणा बंद पडलेली असून ही कामे ऑफलाईन पध्दतीने करावी लागत असल्यामुळे रुग्णांच्या नोंदणी ते रिपोर्ट पर्यंतच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोणतीही पूर्वतयारी न करता अचानक 'एचएमआयएस'ची सेवा बंद करण्यात आल्याने व पर्यायी व्यवस्था न देता जुन्या ऑफलाईन पद्धतीने कामकाज करण्याचे आदेश देण्यात आल्याने स्वा. रा. ती. ग्रा. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई. जि. बीड सह राज्यातील १६ रुग्णालयात रुग्णाची मोठी गैरसोय होत असल्याने पूर्वीप्रमाणेच 'एचएमआयएस' प्रणालीद्वारेच कामकाज सुरु ठेवण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व सचिव, संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्याकडे दिनांक ६ जुलै,२०२२ रोजी वा त्यासुमारास व मा. वैद्यकीय मंत्री यांचेकडे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती , हे खरे आहे काय,

(५)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी कोणती सक्षम पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) सेवा पुरवठादारासोबत करण्यात आलेला करार कालावधी संपुष्टात आल्याने, यापुर्वी कार्यान्वित असलेली एच.एम.आय.एस. प्रणाली बंद करण्यात आली हे खरे आहे.
(२) नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय.
(५) वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांकरिता वापरकर्त्यास अनुकुल असणारी (युझर फ्रेंडली) व अद्यावत आज्ञावलींचा समावेश असलेली सर्वकष एच.एम.आय.एस. प्रणाली कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चौसाळा (जि.बीड) येथील मांजरा नदीवर पूल नसल्याने नागरिक व विद्यार्थांची होत असलेली गैरसोय**

**(२६) * ५०४१३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौसाळा (जि.बीड) येथील मांजरा नदीवरील पुलाअभावी हिंगणी, मुंडेवस्ती आणि आंधळेवस्ती येथील नागरिक , विद्यार्थी यांना दैनंदिन कामकाज व शिक्षणासाठी नदीपात्रातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी पावसाळयात नदीपात्रात येणाऱ्या पुरामुळे शेतकऱ्यांना व विद्यार्थांना नदीपात्रातून प्रवास करणे अत्यंत धोक्याचे ठरते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नदीवर पुल बांधण्याकरिता नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे वारंवार मागणी करुनही अद्यापही यासंदर्भात कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर नदीवर पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदरचा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४३६ असून सदर रस्त्याच्या सा.क्र. 0/५०० मध्ये मांजरा नदीवर नवीन पूल बांधणे आवश्यक आहे. सदर पूलाचे काम नवीन पूलाच्या बांधकामाच्या योजनांमध्ये (उदा. नाबार्ड, जिल्हा वार्षिक योजना, इ.) प्रस्तावित करण्याबाबतच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नागपूर जिल्हा परिषदेत मृत कर्मचाऱ्यांचा निवृत्तीवेतनात झालेला गैरव्यवहार

**(२७) * ५२५४० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत पारशिवनी पंचायत समितीमधील अधिकाऱ्यांच्या संगनमताने मृत कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन १८ बोगस निवृत्तीवेतनधारकांच्या नावे मंजूर करून कोट्यावधी रुपयांची शासनाची फसवणूक करण्यात आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गंभीर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्यानुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय,

सदर प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार श्रीमती सरिता चंद्रशेखर नेवारे, कनिष्ठ सहाय्यक यांनी बनावट निवृत्ती वेतन धारकांचे खोटे पी.पी.ओ. क्रमांक दर्शवून स्वत:च्या, पतीच्या व अन्य नातेवाईकांच्या नावे असलेल्या १७ बँक खात्यामध्ये निवृत्ती वेतन निधी रु.१,८६,५७,१२५/- (एक कोटी शहांऐशी लक्ष सत्तावन्न हजार एकशे पंचवीस) वळती केला आहे. तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचे पी.पी.ओ. गहाळ केले आहेत. तसेच पी.पी.ओ. क्रमांक नसतांना २१ सेवानिवृत्ती धारकाना २ ते ३ निवृत्तीवेतन अदा केले आहे. तसेच तीन सेवानिवृत्त धारकांना मृत्यूनंतरही निवृत्ती वेतन अदा केले आले आहे. त्यामुळे श्रीमती सरिता चंद्रशेखर नेवारे, कनिष्ठ सहाय्यक यांना दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी जिल्हा परिषद सेवेतून निलंबित केले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील डीवाईन केमिकल कंपनीमध्ये झालेला स्फोट

**(२८) * ५५३६० डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील डीवाईन केमिकल कंपनीमध्ये स्फोट होवून दोन कामगारांचा मृत्यू झाला असून अनेक कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देणेबाबत तसेच सदर घटनेस जबाबदार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) डिव्हाईन केमिकल्स कंपनी,प्लॉट नं. सी. २८,२९ आणि ३०, लोटे परशुराम एमआयडीसी, ता.खेड जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक १३ नोव्हेंबर, २०२२ रोजी लागलेल्या आगीत सात कामगार भाजले गेले.

त्यापैकी सहा कामगारांचा वैद्यकीय उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, एका जखमी कामगारांस वैद्यकीय उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. मृत कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देणेबाबत आयुक्त,नुकसान भरपाई रत्नागिरी आणि मा. न्यायदंडाधिकारी, कामगार न्यायालय,

रत्नागिरी यांचे मार्फत कार्यवाही सुरू असून कारखान्याच्या भोगवटादारास नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच कारखाना व्यवस्थापनाने मृत व जखमी कामगारांच्या वैद्यकीय उपचारापोटी रू.४८,९२,२८१/- इतका खर्च केला आहे.

कारखान्यातील दुर्घटनेस जबाबदार असलेल्या कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खेड जि. रत्नागिरी यांचे न्यायालयात महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ७० (४) (f) च्या तरतुदींनुसार खटला दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) ग्रामपंचायतीमध्ये कर्मचाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(२९) * ५०५३८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) ग्रामपंचायत कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी प्रपत्र नमुना क्र. ८ मध्ये खाडाखोड करुन सुमारे १५० घरे स्वत:च्या नावावर करुन गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही १५० घरे मुळ मालक असणाऱ्या गरीब लोकांच्या नावावर करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त १५० घरे मुळ मालक असणाऱ्या गरीब लोकांच्या नावावर करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय,

कर आकारणी नोंद वही (नमुना नं. ८) नुसार १२९ मिळकत धारकाच्या नावामध्ये तफावत निदर्शनास आली असून प. ४१ नावांची नोंद दुबार असून एकूण ८८ तफावत मिळकत धारकांपैकी ४५ मिळकत धारकांची नावे अद्यावत करण्यात आलेली आहेत. उर्वरीत ४३ मिळकत धारकांची नोंद अद्यावत करण्याची कार्यवाही ग्रामपंचायत मार्फत सुरु आहे.

याप्रकरणी दोषींवर निलंबनाची कार्यवाही करुन विभागीय चौकशीअंती शास्तीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भ्वत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद सिंधुदुर्ग बांधकाम विभागात स्वनिधी योजनेतंर्गत झालेला गैरव्यवहार

**(३०) * ५५५४९ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :**सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग बांधकाम विभागामार्फत स्वनिधी योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये पावशी मिटक्याची वाडी शाळा दुरुस्ती, कुडाळ, रस्ता ते चीरेखन ताम्हाणेकर मासंगवाडी रस्ता दुरुस्ती आणि पावशी मुंबई-गोवा महामार्ग लिंगेश्वर सातेरी मंदिर घाडीवाडी वाघवीळ हरीचौक रस्ता खडीकरण करणे इत्यादी कामे मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर कामे न करताच या कामांची देयके संबंधित ठेकेदारास अदा केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
शासन पत्र दिनांक २ डिसेंबर,२०२२ अन्वये चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना सुचना दिलेल्या आहेत.
सदर प्रकरणी प्राथमिक चौकशीअंती संबधीत शाखा अभियंता यांना निलंबीत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(३१) * ५४०२४ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत पहिल्या टप्प्यात ४०८ गावांचा समावेश असून यातील ३६७ कामे प्रत्यक्षात सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांचे वाटप करताना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड व संबंधित कर्मचाऱ्यांच्या संगनमताने स्वत:च्या मर्जीतल्या व नातेवाईकांच्या संस्थांना नियमबाह्यरित्या बनावट कागदपत्रांच्या आधारे कामे देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या मिशनअंतर्गत निविदा प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या अध्यक्षतेखाली ०६ सदस्यांची चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुंषगाने उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) जिल्हा स्तरीय पाणी व स्वच्छता मिशनने १३६७ गावांच्या नळ पाणी पुरवठा योजना आराखड्यास मान्यता दिलेली असून, त्यापैकी दिनांक १५.१२.२०२२ पर्यंत ११६७ योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे व ११४३ योजनांसाठी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. पात्र ९५६ निविदा धारकास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून, त्यापैकी ४८९ योजनांची कामे प्रत्यक्षात सुरु आहेत हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत कार्यवाही करतांना संबंधित निविदा लिपीकास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्रथम दर्शनी निलंबीत केले असून उप कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या संबंधित उप अभियंता (यांत्रिकी) यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, भुजल सर्वेक्षण यंत्रणा, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे.
(४) हे खरे आहे.
(५) जिल्हाधिकारी, बीड यांचे स्तरावर चौकशी करण्यात येवून अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर

करण्यात आला. याबाबत विभागीय स्तरावरही चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशी अहवालातील सूचनांच्या अनुषंगाने एकुण २३ योजनांसाठी दिनांक १५.१२.२०२२ रोजी जिल्हा परिषद स्तरावर सुनावणी घेण्यात येवून त्यातील ०३ योजनांसाठी फेर ई-निविदा करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आकरे परिसरातील विद्यार्थी , ग्रामस्थ, तसेच शेतकऱ्यांना नदीवर पूल नसल्यामुळे होत असलेली गैरसोय**

**(३२) * ५०७९५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आकरे परिसरातील आंब्याचा पाडा आणि अन्य भागातील विद्यार्थी, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांना आंब्याचा पाडा ते तासूपाडा जाण्यासाठी नदीवर पूल नसल्यामुळे जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चांभारशेत व तासूपाडा परिसरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना पुलाअभावी सहा किलोमीटर लांब फेरा मारुन प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी पूल बांधण्यात यावा अशी मागणी तेथील स्थानिक रहिवाशी व विद्यार्थ्यांकडून शासनाकडे वारंवार करण्यात येवूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर ठिकाणी पुल बांधण्याबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ९ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर ठिकाणी पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) अशा प्रकारची मागणी/निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(५) आकरे ग्रामपंचायत अंतर्गत आंब्याचापाडा हा प्रजिमा-१७ रस्त्यावर आहे. तसेच चांभारशेत ग्रामपंचायत अंतर्गत तासुपाडा हा ग्रामा-९४ रस्त्यावर आहे. तासुपाडा येथे रयत शिक्षण संस्थेची शाळा आहे.
आंब्याचापाडा येथील काही विद्यार्थी/ ग्रामस्थ ४.0 कि.मी. लांबीच्या कच्या पायवाटेचा वापर चांभारशेत/तासुपाडा येथे जाण्यासाठी करतात. सदर पायवाटेवरील नाल्यावर सिमेंट कॉंक्रिट बंधारा अस्तित्वात आहे.
तथापि आंब्याचापाडा येथून चांभारशेत/ तासुपाडा येथे जाण्यासाठी ५.0 कि.मी. लांबीचा पर्यायी डांबरी रस्ता अस्तित्वात असून सदर रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे. त्यामुळे आंब्याचापाडा परिसरातील ग्रामस्थ/विद्यार्थ्यांची दळणवळणा संदर्भात कोणतीही गैरसोय होत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील देसाईगंज मध्ये थर्मल प्लांटच्या बॉयलरचा स्फोटात एक अभियंत्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(३३) * ५४६८० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज शहराच्या जुनी वडसा वार्डालगतच्या ए.ए.एनर्जी थर्मल प्लांटमध्ये दिनांक २७ ऑक्टोंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या स्फोटात एका अभियंताचा घटनास्थळी मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर मृत झालेल्या कामगाराच्या परिवारास अर्थसहाय्य देण्याबाबत तसेच दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.ए.ए.एनर्जी लि.,देसाईगंज,वडसा, जि.गडचिरोली येथील वीज निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये बाष्पकाचा हाय प्रेशर पाईप फुटून दिनांक २७ ऑक्टोबर,२०२२ रोजी अपघात घडला आहे.

सदर अपघातामध्ये तीन व्यक्ती भाजल्यामुळे जखमी झाले आहेत.

वैद्यकीय उपचारादरम्यान एका अभियंत्याचा हृदयविकारामुळे दिनांक २७ ऑक्टोबर,२०२२ रोजी मृत्यू झाला आहे,हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणाची बाष्पके संचालनालय तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचेमार्फत तात्काळ चौकशी करण्यात आली आहे.

कामगार नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ च्या तरतुदींनुसार मृत अभियंता श्री.संजय सिंग यांचे वारसास नुकसान भरपाई देण्यासाठी रू.१४,९९,८५०/- इतकी रक्कम मा.कामगार न्यायालय,नागपूर यांचेकडेजमा करण्यात आली आहे.

तसेच श्री.संजय सिंग या मृत अभियंत्याच्या जवळच्या नातेवाईकास व्यवस्थापनाने नोकरी देऊ केली असून,त्यांच्या वारसांस सानुग्रह अनुदान देण्याबाबत कारखाना व्यवस्थापनास सूचीत करण्यात आले आहे.

कंपनी व्यवस्थापनाने जखमी व्यक्तींचा वैद्यकीय उपचाराचा रू.२९,००० /- इतका खर्च केला आहे.

प्राथमिक चौकशीदरम्यान आढळून आलेल्या तांत्रिक चुकांच्या अनुषंगाने कंपनीविरूध्द खालील कार्यवाही करण्यात आली आहे.

१. बाष्पक प्रचालन अभियंत्याचे प्रमाणपत्र जप्त करण्यात आले आहे.

२. कंपनीचा बाष्पक वापरण्यासाठी दिलेले प्रमाणपत्र रदद करण्यात आले आहे.

३. बाष्पक प्रचालन अभियंता नियम, २०२१ च्या नियम ४७ नुसार बाष्पक प्रचालन अभियंत्यावर कार्यवाही प्रस्तावीत आहे.

४. बाष्पके अधिनियम, १९२३ व केंद्रशासनाचे बाष्पके अपघात नियम, २०२१ अन्वये केंद्रीय बाष्पक मंडळातील प्रतिनिधींची चौकशी समिती गठित करून ज्या अपघातामध्ये मृत्यू झालेला आहे. अशा प्रकरणांची चौकशी समितीमार्फत करणे बंधनकारक आहे.त्यामुळे केंद्रीय बाष्पक मंडळामार्फत गठित चौकशी सुरू आहे.त्यांनतर बाष्पके अधिनियम, १९२३ अन्वये कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे.

५. तसेच कंपनीविरूध्द बाष्पके अधिनियम, १९२३ च्या कलम ६ (ई) आणि बाष्पक प्रचालन नियम, २०२१ च्या नियम ४ व ७ नुसार कायदेशीर कारवाई प्रस्तावीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील हाफकिन बायोफार्मा महामंडळाने जादा दराने ग्लोव्हज खरेदी केल्याबाबत**

**(३४) * ५५४४० डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील हाफकिन बायोफार्मा महामंडळाने सन २०२० ते २०२३ या तीन वर्षांकरिता एक कोटी रुपयांच्या वैद्यकीय ग्लोव्हजची खरेदी करताना चढ्या दराने खरेदी केल्याने शासनाला सुमारे आठ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर निश्चितीबाबत राज्य शासनाने दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेले निर्देश अस्तित्वात असतानाही त्याचे पालन न झाल्यामुळे शासनाच्या कोट्यवाधी रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१), (२) व (३) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांकरिता ग्लोव्हज खरेदी करण्यासाठी शासनाने दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनंतर विविध ग्लोव्हजच्या विनिर्देशनामध्ये (specifications) बदल करण्यात आल्याने ग्लोव्हजच्या खरेदीच्या दरात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून खुलासा मागविण्याचे निर्देश आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन महामंडळ यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.